# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

**संलग्न: सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन**
**पत्रव्यवहाराचा पत्ता:** ईशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगांव, अहमदनगर ४१४ ००१
**ई मेल:** cyclingassociationmaharashtra@gmail.com **मोबाईल क्र.** : ७३८ ५०८ १२७० ; ९४२ २३३ ६८०८
सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अंतर्गत नोंणी क्र: 694/16 & F/24689

- **अध्यक्ष** : ॲड विक्रम रोठे
- **सचिव** : प्रा. संजय साठे
- **संघटन सचिव** : प्रताप जाधव
- **खजिनदार** : भिकन अंबे

**दिनांक** : ३१ ऑक्टोबर २०२२

**प्रति,**
**मा. अध्यक्ष / सचिव,**
**जिल्हा सायकलिंग असोसिएशन**

स. न. वि. वि.

**विषय: गोहत्ती, आसाम येथे होणा-या राष्ट्रीय ट्रॅक सायकल अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सहभागी होणारा महाराष्ट्र संघ निवडण्यासाठी निवड चाचणी स्पर्धा.**

महोदय / महोदया,

१) सन २०२२ - २३ च्या सर्व वयोगटासाठीच्या ७४ वी वरीष्ठ गट (Senior) ५१ वी ज्युनिअर ( Junior) व ३७ वी सब ज्युनिअर ( Sub Junior) राष्ट्रीय ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा **दिनांक ११ ते १५ डिसेंबर २०२२ दरम्यान गोहत्ती, आसाम** येथे होत आहेत.

२) **सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने आपणांस सूचित करण्यात येते की या स्पर्धेमध्ये सहभागी होणारा महाराष्ट्र संघ निवडण्यासाठी राज्यस्तरीय खुली निवड चाचणी स्पर्धा रविवार दिनांक ६ नोव्हेंबर २०२२ रोजी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे, पुणे येथील क्रीडा संकुलातील व्हेलोड्रमवर आयोजित करण्यात आली आहे.**

३) यापूर्वी गत आठ वर्षांपासून घेण्यात आलेल्या निवड चाचणीप्रमाणेच यावेळीसुद्धा निवडचाचणी घेण्यात येईल. निवडचाचणीमध्ये दिलेल्या वेळेनुसार **पात्र सायकलपटूची संघातील निवड निश्चित करण्यात येईल.**

४) निवड चाचणीसाठी येणा-या खेळाडूंनी निवास व भोजन व्यवस्था स्वत:ची स्वत: करावयाची आहे.

५) **केवळ पहिला वा दुसरा आला म्हणून महाराष्ट्राच्या संघात निवड होणार नाही तर गत काही राष्ट्रीय स्पर्धेमधील ४ ते ६ क्रमांकाच्या किंवा कांस्य पदक विजेत्या सायकलपटूच्या कामगिरीशी सरासरी तुलना करुन महाराष्ट्राचा संघ निवडण्यात येईल.**

६) **स्वत:च्या वयोगटाशिवाय नजीकच्या वरील वयोगटात सायकलपटूस सहभागी होता येईल मात्र त्यासाठी त्या त्या वयोगटाच्या निवड चाचणीमध्ये भाग घेऊन पात्र व्हावे लागेल.**

७) प्रत्येक वयोगटात प्रत्येक प्रकारासाठी (Event) नोंदणी खर्च प्रत्येकी रुपये ५००/- आहे.

८) नवी दिल्ली येथे सुरु असलेल्या राष्ट्रीय प्रशिक्षण शिबीरात महाराष्ट्राचे सायकलपटू प्रशिक्षण घेत आहेत त्यांना या राष्ट्रीय स्पर्धेसाठी सीएफआय च्या मार्गदर्शनानुसार व यापूर्वीच्या आपल्या धोरणानुसार महाराष्ट्राच्या संघात थेट निवड करण्यात आली आहे.

हे सायकलपटू खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आपापल्या वयोगटात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करतील. **(नवी दिल्ली व गोहत्ती येथील अकॅडमीच्या सायकलपटूंस अंतिम निवडचाचणीमध्ये सहभागी होऊन या राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र व्हावे लागेल)**

९) सोबत निवड चाचणी स्पर्धेची कार्यक्रमपत्रिका व निवड चाचणीसाठी पात्रता वेळ तपशिलवार दिली आहे.

| Sr. No. | Name | Age Group | Remark |
|---|---|---|---|
| 1 | Mayuri Lute | Women Elite | |
| 2 | Pooja Danole | Women Junior | |
| 3 | Sadnya Kokate | Women Junior | |
| 4 | Vedant Tajane | Men Junior | |

१०) जिल्हा संघटकांनी काही शंका असल्यास पुढील मोबाईल क्रमांक **९४२२३३६८०८** वर संपर्क साधावा.

११) संघ भावना न जोपासणा-या किंवा बेशिस्त वर्तन करणा-या सायकलपट्टूंची महाराष्ट्र संघातील निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

१२) निवडीसाठी खेळाडूंनी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पालकांचा कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप झाल्यास संबंधीत सायकपट्टूचा निवड चाचणी स्पर्धेतील / राष्ट्रीय स्पर्धेतील सहभाग रद्द करण्यात येईल.

१३) निवड चाचणी दरम्यान किंवा राष्ट्रीय स्पर्धेदरम्यान दिलेल्या सोयी केवळ सहभागी सायकलपट्टूंसाठी आहेत पालक वा ईतरांनी त्याचा लाभ घेतल्यास किंवा त्यांना लाभ घ्यावयाचा असल्यास सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाची लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१४) **महत्वाचे - प्रत्येक सायकलपट्टूकडे ट्रॅकची स्वत:ची सायकल हवी ईतर कोणतीही सायकल चालणार नाही.**

१५) असे निदर्सनास आले आहे की राष्ट्रीय सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धे दरम्यान काही सायकलपट्टू अत्यंत बेजबाबदार, उद्धट व बेशिस्त वागतात. गत काही स्पर्धांमध्ये अशा सायकलपट्टूंचे इव्हेंट नाईलाजास्तव रद्द करावे लागले. या स्पर्धेदरम्यान काही सायकलपट्टूंना महाराष्ट्राचे टी शर्ट / ट्रॅक स्यूट घालण्याची लाज वाटत होती अशांवरही कारवाई करण्यात आली होती. ज्या सायकलपट्टूंना महाराष्ट्राचे टी शर्ट वा ट्रॅक स्यूट घालावयाचे नाहीत वा नियमात रहावयाचे नाही त्यांनी कृपया या निवड चाचणीमध्ये सहभागी होऊ नये.

१६) राष्ट्रीय स्पर्धेदरम्यानच्या कालावधीत सर्व सहभागी सायकलपट्टूंना त्यांचे मोबाईल संघ व्यवस्थापनाकडे जमा करावे लागतील, जे सायकलपटू त्यांचे मोबाईल जमा करणार नाहीत वा तसे करण्यास नकार देतील त्यांचा राष्ट्रीय स्पर्धेतील सहभाग रद्द करण्यात येईल. (मोबाईलमुळे सायकलपट्टू रात्री खूप उशीरपर्यंत जागरण करतात व त्याचा परिणाम संघाच्या कामगिरीवर होतो.)

१७) निवड चाचणी CFI व UCI च्या नियमानुसार पार पडेल.

१८) सर्व जिल्हा संघटना तसेच खेळाडू नेहमीप्रमाणे सहकार्य करतील ही अपेक्षा.

कळावे, धन्यवाद.

आपले स्नेहांकित,

**प्रताप जाधव** — मानद सचिव

**प्रा. संजय साठे** — सचिव

**सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र**

**प्रत महीती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:**

1. मा. आयुक्त
   क्रीडा व युवक सेवा संचालननालय, पुणे
2. मा. जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे.

**या प्राथमिक व पहिल्या निवड चाचणीसाठी वयोगट, इव्हेंट व पात्रता वेळ पुढीलप्रमाणे राहतील :-**

| अ. क्र. | वयोगट / जन्मसाल | प्रकार | पात्रता वेळ (Qualifying Time) | चाचणीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | Youth Boys (जन्मवर्ष २००८, २००९ व २०१०) | 500 mtr Time Trial | 40.00 Sec | **रविवार दि. ६ नोव्हेंबर २०२२**<br><br>**सकाळी ७.०० वाजता सायकलिंग व्हेलोड्रम, शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे रिपोर्टींग असेल व दिलेल्या क्रमानुसार सकाळी ७.३० वाजता निवड चाचणीस सुरवात होईल.**<br><br>**तत्पूर्वी सकाळी ७.१५ वाजता तेथेच सर्व सायकलपटूंची बैठक होईल.** |
| २. | Youth Girls (जन्मवर्ष २००८, २००९ व २०१०) | 500 mtr Time Trial | 46.00 Sec | |
| ३. | WJ: Women Junior (**जन्मवर्ष** २००४ **व** २००५) | 500 mtr Time Trial | 43.00 Sec | |
| ४. | MJ: Men Junior (**जन्मवर्ष** २००४ **व** २००५) | 1000 mtr Time Trial | 1:15.00 Sec | |
| ५. | **Sub Juniors Boys** (**जन्मवर्ष** २००६ व २००७) | 2000 mtr Ind. Pursuit | 2 min 37.00 Sec | |
| ६. | **Sub Juniors Girls** (**जन्मवर्ष** २००६ व २००७) | 2000 mtr Ind. Pursuit | 3 min 09.00 Sec | |
| ७. | **ME: Men Elite** (**जन्मवर्ष सन २००३ व त्या अगोदरच**) | 4000 mtr Ind. Pursuit | 5 min 07.00 Sec | |
| ८. | **WE: Women Elite** (**जन्मवर्ष** सन २००३ **व त्या अगोदरचे**) | 3000 mtr Ind. Pursuit | 4 min 30.00 Sec | |
| | | | | |
| १. | **Sub Juniors Girls** (**जन्मवर्ष** २००६ व २००७) | 500 mtr Time Trial | 45.00 Sec | |
| २. | **Sub Juniors Boys** (**जन्मवर्ष** २००६ व २००७) | 500 mtr Time Trial | 39.00 Sec | |
| ३. | **WE: Women Elite** (**जन्मवर्ष** सन २००३ **व त्या अगोदरचे**) | 500 mtr Time Trial | 43.00 Sec | |
| ४. | **ME: Men Elite** (**जन्मवर्ष सन २००३ व त्या अगोदरच**) | 1000 mtr Time Trial | 1 min 11.00 Sec | |
| ५. | Youth Boys (जन्मवर्ष २००८, २००९ व २०१०) | 2000 mtr Ind. Pursuit | 2 min 46.00 Sec | |
| ६. | Youth Girls (जन्मवर्ष २००८, २००९ व २०१०) | 2000 mtr Ind. Pursuit | 3 min 16.00 Sec | |
| ७. | WJ: Women Junior (**जन्मवर्ष** २००४ **व** २००५) | 2000 mtr Ind. Pursuit | 3 min 03.00 Sec | |
| ८. | MJ: Men Junior (**जन्मवर्ष** २००४ **व** २००५) | 3000 mtr Ind. Pursuit | 3 min 57.00 Sec | |

महत्वाचे : टायपिंगची चूक असल्यास दुरुस्त केल्यानंतरची ग्राह्य समजण्यात येईल.

**निरोगी राहण्याचा एकच मंत्र; सायकल चालविण्याचे अवगत करा तंत्र**